पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.क्रिडा समिती

कार्यपत्रिका क्रमांक १६

**सभावृत्तांत**

दिनांक - १५/०१/२०१४ वेळ - दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक १५/१/२०१४ रोजी दुपारी ४.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. बोकड रामदास गेणभाऊ - **सभापती**
२) मा. सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
३) मा. वसंत (नाना) आनंदराव लोंढे
४) मा. वाघेरे प्रभाकर नामदेव
५) मा. प्रसाद शेट्टी
६) मा. काळे विमल रमेश
७) मा. आल्हाट धनंजय मुरलीधर

या शिवाय मा.खांडकेकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.बहुरे – प्रशासन अधिकारी, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.२) महापौर चषक जिल्हास्तर बॉक्सिंग स्पर्धा २०१४ आयोजित करणेबाबत – मा.मंदाकिनी ठाकरे, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) महापौर चषक राज्यस्तर शरीरसौष्ठव स्पर्धा २०१४ आयोजित करणेबाबत – मा.मंदाकिनी ठाकरे, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) महापौर चषक राज्यस्तर कुस्ती स्पर्धा २०१४ आयोजित करणेबाबत – मा.विमल काळे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) सँडविक कॉलनी, भोसरी व पिंपरी वाघेरे गांव विरंगुळा केंद्र येथे क्रीडा साहित्य देणेबाबत – मा.प्रभाकर वाघेरे, मा.वसंत लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) खेळाडू दत्तक योजना निवड समिती सदस्य नेमणूकीबाबत – मा.वसंत लोंढे, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) बोट क्लब थेरगाव येथे कायाकिंग व कनोईंग क्रीडा साहित्य खरेदी होणेबाबत – मा.मंदाकिनी ठाकरे, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) जेष्ठ नागरिक संघास क्रीडा साहित्य मिळणेबाबत – मा.वसंत लोंढे, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव.

----------

ठराव क्रमांक – ७२ विषय क्रमांक – १

दिनांक – १५/१/२०१४ विभाग – क्रीडा

सूचक – मा. वसंत लोंढे अनुमोदक – मा.प्रभाकर वाघेरे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७अ/कावि/५७/१४ दि.१/१/२०१४.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आंतरशालेय ८ कला व गिर्यारोहण स्पर्धा आयोजित करणेस व त्यानुषंगाने विद्यार्थ्यांना द्यावयाचा खाऊ/बिस्किटे खरेदी, कला पुस्तिका छपाई, चित्रकला कागद खरेदी, फ्लेक्स बॅनर, ट्रॉफीज निमंत्रण पत्रिका व प्रमाणपत्र छपाई इ. खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन खरेदी करणेस तसेच प्रेक्षागृह भाडे, पी.एम.पी.एम.एल. बस भाडे कामी येणा-या अंदाजे खर्च र.रु.३,३२,२००/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व सदर खर्च क्रीडा निधी मधील कला क्रीडा साहित्य या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस तसेच चित्रकला, लेझीम व गिर्यारोहण या स्पर्धा अनुषंगाने स्टेज, मंडप, टेबल खुर्च्या इ. खर्च स्थापत्य विभाग, संबंधीत प्रभाग व विद्युत स्पिकर, माईक व्यवस्था खर्च विद्युत विभाग संबंधीत प्रभागातून खर्ची टाकणेस मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ७३ विषय क्रमांक – २

दिनांक – १५/१/२०१४

सूचक – मा. मंदाकिनी ठाकरे, अनुमोदक – मा. विमल काळे

संदर्भ – मा.मंदाकिनी ठाकरे, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पुणे जिल्हा बॉक्सिंग असो. यांचे मान्यतेने व पिंपरी चिंचवड सिटी बॉक्सिंग असोशिएशन, पिंपरी यांचे सहकार्याने माहे फेब्रुवारी २०१४ मध्ये महापौर चषक जिल्हास्तर बॉक्सिंग स्पर्धा २०१४ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.४,८६,७००/- चे खर्चास मान्यता व सदर खर्चातील स्थापत्य विषयक खर्च र.रु.५०,०००/- हा स्थापत्य विभाग संबंधित प्रभाग व विद्युत विषयक खर्च र.रु.३०,०००/- हा विद्युत विभाग संबंधित प्रभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित खर्च र.रु.४,०६,७००/- हा क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस तसेच मेडल्स, ट्रॉफीज, सन्मानचिन्हे खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, निमंत्रणपत्रिका व प्रमाणपत्रे छपाई इ. कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४ विषय क्रमांक – ३

दिनांक – १५/१/२०१४

सूचक – मा. मंदाकिनी ठाकरे, अनुमोदक – मा. विमल काळे

संदर्भ – मा.मंदाकिनी ठाकरे, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महाराष्ट्र बॉडीबिल्डर्स असो. यांचे मान्यतेने माहे जानेवारी २०१४ मध्ये प्राधिकरण निगडी येथे महापौर चषक राज्यस्तर शरीरसौष्ठव स्पर्धा २०१४ आयोजित करणेस व त्याकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे येणा-या अंदाजे र.रु.८,१९,०००/- चे खर्चास मान्यता व सदर खर्चातील स्थापत्य विषयक खर्च र.रु.१,००,०००/- हा स्थापत्य विभाग संबंधित प्रभाग व विद्युत विषयक खर्च र.रु.५०,०००/- हा विद्युत विभाग संबंधित प्रभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित खर्च र.रु.६,६९,०००/- हा क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस तसेच स्पर्धा अनुषंगाने मेडल्स, ट्रॉफीज, सन्मानचिन्हे खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, निमंत्रणपत्रिका व प्रमाणपत्रे छपाई इ. कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५ विषय क्रमांक – ४

दिनांक – १५/१/२०१४

सूचक – मा. विमल काळे, अनुमोदक – मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ – मा.विमल काळे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने माहे फेब्रुवारी २०१४ मध्ये पिंपरी वाघेरे गाव येथे महापौरचषक राज्यस्तर कुस्ती स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७६ विषय क्रमांक – ५

दिनांक – १५/१/२०१४

सूचक – मा. प्रभाकर वाघेरे अनुमोदक – मा. वसंत लोंढे

संदर्भ – मा. प्रभाकर वाघेरे, मा. वसंत लोंढे यांचा प्रस्ताव –

म.न.पा. क्रीडा विभागाच्यावतीने सॅन्डविक कॉलनी, भोसरी व पिंपरी वाघेरे गांव येथील विरंगुळा केंद्रात २ कॅरम बोर्ड, २ बुध्दीबळ सेट, १ टेबल-टेनिस सेट उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७७ विषय क्रमांक – ६

दिनांक – १५/१/२०१४

सूचक – मा. वसंत लोंढे अनुमोदक – मा. प्रभाकर वाघेरे,

संदर्भ – मा.वसंत लोंढे, मा.प्रभाकर वाघेरे, यांचा प्रस्ताव –

खेळाडू दत्तक योजना निवड समितीवर कुस्ती हा खेळ समाविष्ट झाला असून सदर खेळातील तज्ञ (सदस्य) म्हणून श्री. विजय हनुमंत गावडे (भारत केसरी) यांची तसेच श्री. महेश मादरंग वाघीरे यांची निवड करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७८ विषय क्रमांक – ७

दिनांक – १५/१/२०१४

सूचक – मा. मंदाकिनी ठाकरे अनुमोदक – मा. विमल काळे

संदर्भ – मा.मंदाकिनी ठाकरे, मा.विमल काळे, यांचा प्रस्ताव –

बोटक्लब थेरगाव येथे कायाकिंग व कनोईंग हा क्रीडा प्रकार क्रीडा विभागांतर्गत सन २००५ पासून चालविला जात आहे. त्या ठिकाणी महानगरपालिका प्रबोधिनीकडील K1 = 2, K2 = 2 आणि चार पेंडल होते. या शहरातील खेळाडू येथे सराव करुन ते राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत खेळून महानगरपालिकेचे नावलौकीक केले आहे. परंतु सध्या त्या बोटी खराब व नादुरुस्त झाल्यामुळे महानगरपालिका क्रीडा प्रबोधिनीकडे जमा करणेत आलेल्या आहेत. त्यामुळे खेळाडूंचा सराव पुर्णपणे बंद आहे. दिनांक १३/१२/२०१३ च्या मा.अति.आयुक्त यांचे तपासणी व चर्चेत पूर्वी क्रीडा प्रबोधिनी प्रशासनाकडून जसे त्या बोटी क्रीडा विभागाकडून खरेदी केल्या होत्या त्या धोरणानुसार खालीलप्रमाणे नवीन बोटी खरेदी करण्यात याव्यात.

**बोटींचा प्रकार – कयाकिंग**

| अनुक्रमांक | बोटींचा तपशील | प्रकार | नगरसंख्या |
|---|---|---|---|
| १ | K - १ | कयाकिंग | ३ |
| २ | K - २ | कयाकिंग | ३ |
| ३ | K - ४ | कयाकिंग | ३ |

**बोटींचा प्रकार – कनोईंग**

| अनुक्रमांक | बोटींचा तपशील | प्रकार | नगरसंख्या |
|---|---|---|---|
| १ | C - १ | कनोईंग | ३ |
| २ | C - २ | कनोईंग | ३ |
| ३ | C - ४ | कनोईंग | ३ |

**बोटींचा प्रकार – पेंडल**

| अनुक्रमांक | बोटींचा तपशील | प्रकार | नगरसंख्या |
|---|---|---|---|
| १ | Brasca Kayak | कयाकिंग | १२ |
| २ | Brasca canoeing | कनोईंग | १२ |

वरील प्रमाणे क्रीडा साहित्य खरेदी करणे आवश्यक असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७९ विषय क्रमांक – ८

दिनांक – १५/१/२०१४

सूचक – मा. वसंत लोंढे अनुमोदक – मा.प्रभाकर वाघेरे

संदर्भ – मा.वसंत लोंढे, मा.प्रभाकर वाघेरे यांचा प्रस्ताव –

मधुबन प्रभाग क्र.५९ मधील सांगवी येथे जेष्ठ नागरिक संघ ब-याच वर्षापासून कार्यरत आहे. सांगवी येथील मनपा अहिल्यादेवी होळकर शाळेमध्ये जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र असून विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा नेहमी सहभाग असतो. त्यांच्या मागणीनुसार त्यांच्या विरंगुळा केंद्रास क्रीडा विभागाकडून २ कॅरम बोर्ड, २ बुध्दीबळ सेट, २ बॅडमिंटन व १ टेबल-टेनिस सेट हे खेळाचे साहित्य देण्यास मान्यता देणेत येत आहे.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(बोकड रामदास गेणभाऊ)
**सभापती**
मा.क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ५६ /२०१४
दिनांक – / ०१ /२०१४



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.